# १३ वा वित्त आयोग सन २०१०-२०१५ ग्रामपंचायत स्तर
# ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद, सोलापूर

**प्रस्तावना:-**

केंद्रीय वित्त अयोगाच्या शिर्फाईरशीनुसार राज्यातील पंचायत राज संस्थांना त्यांच्या बळकटीकरणासाठी अनुदान देण्यात येते. दिनांक:- १ एप्रिल २०१० पासून १३ व्या वित्त आयोगास प्रारंभ झाला असून त्याचा कालखंड एप्रिल २०१० ते मार्च २०१५ असा आहे. केंद्र शासनाने राज्यांसाठी निधी वितरीत करताना सदर निधीची परिगणना लोकसंख्या, क्षेत्रफळ, उच्चतम दरडोई उत्पन्नापासूनची तफावत, हस्तांतरणाचा निर्देशांक (Index of Devolution) अनुसुचित जाती/जमातीची लोकसंख्या व वित्त आयोगाच्या निकषानुसार केली आहे. सदर योजनेसाठी प्राप्त होणारा निधी खालील ४ प्रकारात प्राप्त होणार आहे. १) जनरल बेसिक ग्रँट. २) जनरल परफॉर्मन्स ग्रँट. ३) स्पेशल एरीया बेसिक ग्रँट. ४) स्पेशल एरीया परफॉर्मन्स ग्रँट.

**जिल्हा परिषद स्तरावरुन ग्रामपंचायतींसाठी जनरल बेसिक ग्रँट व जनरल परफॉर्मन्स ग्रँटच्या तसेच स्पेशल एरीया बेसिक ग्रँट स्पेशल एरीया परफॉर्मन्स ग्रँटच्या वाटपाचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | निकष | ग्रामपंचायत टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीची लोकसंख्या | ४०% |
| २ | ग्रामपंचातीमधील अनुसुचीत जाती व जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण | १०% |
| ३ | वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाचे प्रमाण | १०% |
| ४ | पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेची अंमलबजावणी | १५% |
| ५ | प्लॅन प्लस सॉफ्टवेअरचा वापर | ०५% |
| ६ | यशवंत पंचायत राज अभियानाची अंमलबजावणी | ०५% |
| ७ | भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी ठरवून दिलेल्या सुधारीत नमुन्यात लेखे ठेवण्याची अंमलबजावणी करणे (प्रिया सॉफ्ट) | १०% |
| ८ | ग्रामरचना आराखडा मंजूर असलेल्या ग्रामपंचायती | ०५% |
| | **एकूण** | **१००%** |

**सदर योजनेतून ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणेच कामे घेता येतील**

१) ग्रामपंचायतींच्या क्षेत्रांतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची (Assets) देखभाल दुरुस्तीची कामे.

२) गावांतर्गत गटारे व रस्ते बांधकाम (मुरमीकरण, खडीकरण, डांबरीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण). तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे सदर कामे करताना शासनाने विहीत केलेल्या मानांकाचे तंतोतंत पालन करावयाचे आहे.एकच काम वेगवेगळ्या योजनांच्या निधीतून एकाचवेळी हाती घ्येण्यात येणार नाहीत .

३) ग्रापंचायत कार्यालय/ ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्याची देखभाल दुरुस्ती संबधीत ग्रामपंचायतीनी करावयाची आहे.(हे बांधमाक बी. आर.जी.एफ चा निधी व दम.आर.ई.जी.एस. अंतर्गत राजीव गांधी भवनासोबत एकत्रितपणे विहीत प्राधिका-याचची मंजुरी घेऊन करता येईल.)

४) दहनभुमी/दफनभुमी देखभाल व दुरुस्ती.

५) आरोग्य, ग्रामस्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत कामे (उदा. पोर्टेबल व व्हेईकल माऊंटेड फॉगींग मशिन, घंटागाडी, ट्रॅक्टर ट्रॉली)

६) घनकचरा प्रक्रियेसाठी (Solid Waste Management) पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रिय पध्दतीने कमी खर्चाचे प्रल्प हाती घेणे.

७) पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनसंबधी ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दि. १८ ऑगस्ट २०१० च्या शासन निर्णयात अंतर्भुत असलेल्या विविध बाबींसाठी पूरक म्हणून या निधीचा वापर करणे.

८) ग्रामसभा/ ग्रामपंचायत सभा यांच्या दृकश्राव्य चित्रीकरणाची (VIDEO/AUDIO RECORDINNG) व्यवस्था करण्यासाठी आवश्यक उपकरणे/साधणे घेणे व त्यासाठी आवश्यक तंत्रबळ उपलब्ध करुन घेणे.

**वित्त आयोगाच्या जनरल बेसिक अँड जनरल परफॉर्मन्स ग्रँडच्या निधीतून राज्यस्तरावरुन पंचायत राज संस्थांसाठी (जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तरावर) हाती घ्यावयाच्या समाईक बाबी व त्याबद्दलची कार्यपध्दती खालीलप्रमाणे.**

१) **प्रियासॉफ्टवेअर :-** पंचायत राज संस्थानी (जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत स्तर) त्यांचे लेखे PRIAsoft या संगणकीय आज्ञावलीत ठेवण्यासाठी, पंचायत राज संस्थांना संगणक व अनुषंगीक साहित्य उपलब्ध करुन देणे.

२) **आय.एस.ओ.प्रमाणकीकरण:-** पंचायत राज संस्थाधील (जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायतीमधील ) मनुष्यबळ विकास करणे आणि त्या संस्था नागरीकांना सेवा पुरविण्यासाठी व कामाच्यासंदर्भात अधिक कार्यक्षम व लोकाभिमुख होण्यासाठी I.S.O. प्रमाणकीकरण करणे.

३) **बायोमेट्रीक्स :-** पंचायत राज संस्थांच्या सर्व स्तरावर कर्मचा-यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी बायोमेट्रीक्स प्रणाली कार्यरत करणे.

४) पंचायत राज संस्थांच्या स्तरावर इ-टेंडरींगसाठी आवश्यक साधन सामुग्री व तंत्रज्ञान उपलब्ध करणे.

५) **सौरउर्जा:-** अपारंपारीक उर्जेचा वापर वाढविण्यासाठी सौरउर्जेवरील उपकरणे व अद्यावत तंत्रज्ञान पंचायत राज संस्थांना उपलब्ध करुन देणे.

६) **आपत्ती व्यवस्थापन:-** पंचायत राज संस्थांसाठी आगीसारख्या आपत्तीच्या निवारणर्थ उपाय योजना करणे.

७) **पंचायत राज संस्थांना सोईसुविधा:-** ग्रामपंचायतींना, अंगणवाड्यांना, प्राथमिक शाळांना, पशुवैद्यकिय दवाखान्यांना, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांना, पंचायत समित्यांना, जिल्हा परिषदांना आवश्यक सोईसुविधा पुरविणे.

८) पंचायत राज संस्थांच्या सर्व स्तरावर राबविल्या जाणा-या शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसिध्द करणे.

९) पंचायत राज संस्थांच्या सर्व स्तरावर महिला शक्ती अभियान राबविण्यासाठी आवश्यक त्या पुरक तरतुदी करणे.